Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भारतातील उच्च शिक्षणाची वस्तुस्थिती आणि आव्हाने

**प्रकाश साहेबराव काळवणे**
समाजशास्त्र विभाग
महिला कला महाविद्यालय,
औरंगाबाद.

**प्रास्ताविक:**

राष्ट्राच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये भौतिक साधनसंपत्तीचा विकास होणे जितके आवश्यक असते तितकेच मानवी संसाधनांचा विकास होणे हे देखील महत्वाचे असते.त्या दृष्टिने प्राथमिक,माध्यमिक शिक्षण महत्वाचे त्याचप्रमाणे उच्च शिक्षणही महत्वाचे असते.जागतिक पातळींवर भारताला शेती,व्यापार आणि सेवा क्षेत्रातील नेतृत्व टिकवून ठेवायचा असेल आणि खऱ्या अर्थाने नजीकच्या भविष्यात भारताला महासत्ता बनायचे असेल तर देशातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता, स्यायत्ता सतत टिकून ठेवणे आवश्यक आहे. " जग बदलण्यासाठी शिक्षणासारखे प्रभावी शस्त्र नाही". नेल्सन मंडेलाचे प्रसिद्ध वाक्य शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी पुरेसे आहे आणि आपल्या देशाचा विचार करता त्याची यथार्थता आणखीनच स्पष्ट होते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) भारतातील सद्यकालीन परिस्थितीत उच्च शिक्षणाची वास्तविकता जाणून घेणे.

२) भारतातील उच्च शिक्षणात कोणकोणती आव्हाने आहेत याचा अभ्यास करणे.

३) उच्चशिक्षणावर उपाययोजना सुचविणे.

**भारतातील उच्च शिक्षणाची वास्तविकता:**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा तेथील उपलब्ध असलेल्या कुशल मनुष्यबळाबर व शिक्षणावर अवलंबून असतो.जोपर्यंत त्या राष्ट्राचे शिक्षणाचे प्रमाण वाढत नाही तोपर्यंत तो देश मागास किवा विकसनशील समजला जातो.अन्न, वस्त्र,निवारा व आरोग्य या प्राथमिक गरजेप्रमाणे शिक्षण ही आजच्या युगात प्राथमिक गरज मानली जाते.भारताला प्राचीन काळापासूनच शिक्षणाची परंपरा लाभलेली आहे. प्राचीन काळात उच्चशिक्षण देणारी तक्षशीला,नालंदा,वल्लभी, पाटणा अशी जगप्रसिध्द शिक्षण केंद्रे होती. भारतात स्वातंत्रपूर्व कालखंडामध्ये सन १८५७ मध्ये केवळ ०३ विद्यापीठे व २७ महाविद्यालये होती.१९५०-५१ मध्ये विध्यापिठांची संख्या ६६५ इतकी झाली.देशात गेल्या सहा दशकात उच्चशिक्षणाचा विस्तार होऊन ती २०१०-११ मध्ये हे प्रमाण विद्यापीठांची संख्या ६३४ तर महाविदयालयांची संख्या ३३०२३ इतकी होती. १०४ लाख विद्यार्थी विद्यापीठ व महाविद्यालयातून शिक्षण घेत आहे.देशात उच्च

शिक्षणात शिक्षकांची संख्या ५ लाख इतकी आहे.सामान्यतः एकूण विद्यार्थीत्यांपैकी ८३ टक्के विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान या शास्त्रात शिक्षण घेतात.भारतामध्ये उच्चशिक्षणाचे प्रमाण १२%ते १३% इतके आहे.इतर देशाच्या तुलनेत हे प्रमाण खूप कमी आहे.देशाचा खऱ्या अर्थाने विकास व्हायचा असेल तर उच्चशिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे.

पण शासन उच्च शिक्षणवरील खर्च दिवसोंदिवस कमी करत आहे. आज भारतात तरुणांची संख्या अधिक आहे.या तरुणांना योग्य ती कौशल्य आणि उत्तम शिक्षण दिले तर ते प्रशिक्षित मनुष्य बळ म्हणून त्यांना जगातून मागणी येईल आणि त्याद्वारे भारताला उत्पादकता वाढविता येईल असे सांगितले जात होते.त्यामुळेच गेल्या दोन उच्चशिक्षणाचा परीघ वाढविण्यावर भर दिला गेला. मात्र, हा विस्तार खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर झाला.उत्तम करीअयरची संधी देणाऱ्या व्यावसायीक शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण झाले.देशातील बहुतेक खाजगी विद्यापीठांना मान्यता दिली.त्याचबरोबर दुरशिक्षनाचे प्रमाण वाढले आणि त्यामध्येही खाजगी क्षेत्राने जम बसविला.या साऱ्यांचा परिणाम म्हणून उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढत गेले.

खरे म्हणजे आपल्या देशाचे भवितव्य देशात तरुण पिढीला कसे शिक्षण मिळते यावर अवलंबून असते. शिक्षणाचे महत्त्व आजच्या काळात तरी कमी लेखून चालत नाही.दरम्यानच्या काळात शिक्षणापुढे अनेक नवनव्या समस्या उभ्या राहिल्या आणि त्यांच्या अनुरोधाने शिक्षण व्यवस्थेत काय बदल केले जावेत याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली. कारण त्यानंतरच देशात मुक्त अर्थव्यवस्था राबवण्यात आली.. मुक्त अर्थव्यवस्थेने देशामध्ये विनाअनुदानित खासगी शिक्षण संस्थाच नव्हे तर विद्यापीठांचेसुध्दा पेव फुटले. या संस्थांना सरकारची अनुमती असली तरी सरकारचे अनुदान मिळत नसल्यामुळे आर्थिकदृष्ट्या या संस्था नेहमीच कमकुवत राहिलेल्या आहेत. परिणामी, शिक्षणाचा दर्जा घसरला आहे. आपल्या देशामध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काही वर्षात शिक्षणावर वट्ट राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च केला जाईल असे सांगण्यात आले होते. सध्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार तूर्तास आपण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्के एवढाही खर्च शिक्षणावर करत नाही.

अमेरिकेसारखा प्रगत देशसुध्दा अजून शिक्षणावर ६ टक्के खर्च करू शकला नाही. काही यूरोपीय देशात मात्र तो ६ टक्क्यांपेक्षाही अधिक असतो. भारतात तर तो ६ टक्के करण्याची गरजच आहे. कारण भारतातले बरेच लोक गरीब आहेत आणि मुक्त अर्थव्यवस्थेने उपलब्ध करून दिलेले महागडे खासगी शिक्षण त्यांच्या मुलांना परवडत नाही. परिणामी चांगली बौध्दिक कुवत असतानाही ती मुले शिक्षणापासून वंचित राहतात. सकृतदर्शनी हे त्या मुलांचे नुकसान असले तरी अंतिमतः ते देशाचे नुकसान असते. कारण तरुण मुलांची बुध्दिमत्ता ही राष्ट्रीय संपत्ती असते. तेव्हा देशातल्या सर्व पात्र आणि बुध्दिमान विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे आणि व्यावसायिक शिक्षण घेण्यावर सरकारनेभर दिला पाहिजे. भारतामध्ये मुळात

लोकसंख्येच्या तुलनेत उच्च शिक्षणाच्या सोयी फार अल्प आहेत. त्यांची ही संख्या कशी वाढवता येईल आणि ही वाढ उद्योगाशी निगडित कशी करता येईल यावर विचार होण्याची नितांत गरज आहे.

भारत हा २९ राज्यांचा देश आहे. त्याची तुलना यूरोप खंडाशीच होऊ शकेल. कारण भारतातल्या अनेक राज्यांपेक्षा यूरोपातले देश लहान आहेत. तसा विचार केला तर भारतीय उपखंड म्हणजे २९ देश आहेत. परंतु प्रत्येक राज्याला एक आयआयटीची निर्मिती आपण अजून करू शकलेलो नाही. अगदी परवा परवापर्यंत देशात केवळ ६ आयआयटी संस्था होत्या. ती संख्या आता ११ वर गेली आहे. ती ३० ते ३५ होण्याची गरज आहे. परंतु त्याला किती वर्षे लागतील हे सांगता येत नाही. मात्र त्याला जितका उशीर लागेल तेवढे देशाचे नुकसान होत जाईल. शिक्षणाच्या संदर्भात उपस्थित केला जाणारा सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नोकरीची क्षमता. हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण होऊ शकतात. परंतु नोकरी करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये त्यांच्याकडे नसल्यामुळे समस्या निर्माण होतात. नोकऱ्या उपलब्ध असतात परंतु विद्यार्थ्यांना त्या नोकऱ्या प्राप्त करता येत नाहीत. तेव्हा नोकरीसाठी आवश्यक असलेली कौशल्ये त्याच्या अंगी यावीत यासाठीसुध्दा वेगळे प्रयत्न करण्याची गरज आहे.

**उच्चशिक्षणाची आव्हाने:**

आज भारताच्या शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत ती जाणून घेणे गरजेचे आहे.भारतातील राज्यामध्ये शैक्षणीक विकासात असमतोल दिसून येतो.केरळ,महाराष्ट्र व कर्नाटक ही राज्ये आघाडीवर आहे तर राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश या राज्यात वाईट परिस्थिती दिसून येते. इतर सामाजिक घटकांच्या तुलनेत पूर्वापार शिक्षणापासून वंचित असलेल्या घटकांचे शिक्षणातील नोंदणीचे प्रमाण हे सरासरी ग्रॉस ऐनरोलमेंट रेशोपेक्षा व इतर सामाजिक घटकांपेक्षा तुलनेने कमी आहे. उच्च शिक्षणातील स्त्री-पुरुष यांच्या प्रमाणात मोठी तफावत आहे. स्त्रियांचे प्रमाण फक्त शे. १६.५ इतके असून, पुरुषांचे शे. २०.९ इतके आहे. त्याचप्रमाणे विविध संस्थामध्ये गुणात्मक फरक असून, ग्रामीण व शहरी विभाग विकसित व अविकसित राज्य यानुसारदेखील ग्रॉस ऐनरोलमेंट रेशोमध्ये फरक दिसून येतो. या विविध आव्हानांचा विचार करता उच्चशिक्षणाच्या विकासासाठी स्वीकारलेल्या परंपरांगत पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. एकूणच, आपल्या भागातील, प्रदेशातील शिक्षणव्यवस्थेत कोणत्या सुधारणा करता येतील, त्यासाठी काय पावले टाकली पाहिजेत, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. प्रामुख्याने आपल्या व्यवस्थेचे मूल्यमापन करणे, व्यवस्थेत सुधारणा करणे यावर भर दिला पाहिजे. आज देशात शिक्षक व प्राध्यापक निर्माण करणाऱ्या केवळ ७ संस्था आहेत. १२५ कोटी लोकसंख्येच्या देशात १ लाख लोकसंख्येच्या मागे किमान १२५ प्रशिक्षण संस्था किंवा मनुष्यबळ विकास संस्थांची गरज आहे. तसे झाल्यास त्या केंद्रांतून देशातील शिक्षक, प्राध्यापक यांना प्रशिक्षण देण्याचा एक कार्यक्रम हाती घेता येऊ शकेल.

खेडी आणि शहरे यांच्यातील अंतरे कमी करणे, आपल्या शाळांना ज्ञानमंदिरे आणि संस्कारकेंद्रे बनवणे आणि आपल्या वैज्ञानिक प्रयोगांच्या आधारे चंद्र, मंगळ, गुरू इत्यादी ग्रहांपर्यंत पोहोचणे आणि विज्ञान-तंत्रज्ञान यांच्या आधारे देशातील गरिबी, दैन्य, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करणे यासाठी आपण आपल्या शैक्षणिक क्षमतांचा पुरेपूर उपयोग करणे आवश्यक आहे.

**उपाययोजना :**

हे शिक्षण सक्तीचे नसले तरी मोफतअसावे.उच्च शिक्षणाचा ग्रॉस एन्रोलमेंट रेशो हा किमान ५० टक्के असला पाहिजे.यासाठी जादा महाविद्यालये व विद्यापीठे स्थापन करणे आवश्यक आहे.ही महाविद्यालयेसरकारी अनुदानितच असली पाहिजेत.कंत्राटी पद्धतीने जागा भरणे, पदे रिक्त ठेवणे, विना अनुदानित अभ्यासक्रम चालवायला मान्यता देणे इ. प्रकार थांबायला पाहिजेत.महाविद्यालये, विद्यापीठे यांची शैक्षणिक स्वायत्तता टिकली पाहिजे. सरकारने त्यावर बंधने टाकण्याचे धोरण अवलंबू नये.उच्च शिक्षण प्रामुख्याने 'ज्ञान निर्मिती'करते त्यासाठी संशोधन सुविधा, विद्यावेतन हे संशोधकांना उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.व्यवसाय प्रशिक्षणाची सोय १२वी नंतरच उपलब्ध करुन दिली पाहिजे.उच्च शिक्षा आयोग विधेयक, नवा विद्यापीठ कायदा, राष्ट्रीय मेडीकल आयोग विधेयके रद्द केली पाहिजेत व विद्यापीठांचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने झाले पाहिजे.१३ टक्के रोस्टर पद्धत बंद करुन, संपूर्ण शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्या राखीव जागा पूर्ण भरल्या गेल्याच पाहिजेत.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत समाजघटकांना स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी व वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी पारंपारिक शिक्षणाचा मुलभूत पाया बदलून नव्या गुणात्मक व स्पर्धात्मक पायावर उभी राहणारी शिक्षण व्यवस्था निर्माण केली गेली पाहिजे त्यासाठी सर्व तज्ञांनी एकत्र येऊन योगदान देणे गरजेचे आहे. तरच या बदलत्या प्रवाहाला सामोरे जाण्यासाठी क्षमता असलेला युवा वर्ग तयार होइल.

**संदर्भ ग्रंथ:-**

१)शिक्षण आणि समाज, डॉ.डी.व्ही.मुळे, दूरशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०१०
२) बदलते शिक्षण : स्वरूप आणि समस्या – डॉ.जनार्धन वाघमारे
३) राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण-१९८६
४) योजना मासिक, जानेवारी २०१६